# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


जावक क्रमांक :- २०५ दिनांक :- २९/०७/२०२१

## सराईत सोन साखळी चोरांना जेरबंद करून 13 गुन्हे उघडकिस करण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणा-या वसई, विरार, नालासोपारा परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन रस्त्याने पायी चालणा-या महिलांचे मंगळसुत्र, सोन्याची चैन आरोपींनी मोटारसायकलवर येवुन जबरीने चोरी करण्याचे प्रमाण वाढल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १७२/२०२१ भा.दं. वि. सं. कलम ३९२, ३४ या गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष- ३ विरार यांचेकडे देण्यात आला होता. सदर गुन्हा उघडकीस आणणे करीता गुन्हे शाखा कक्ष -३ चे पोलीस पथक तयार करुन आयुक्तालय परिसरात घडणारे चैन स्नॅचिंगचे विविध गुन्हयाचे घटनास्थळावरून आरोपिंबाबत माहिती प्राप्त करुन आरोपीत यांनी गुन्हयात वापरलेले वाहन तसेच आरोपीत यांची गुन्हे करण्याची पध्दतीवरुन गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने आरोपीत याची माहीती मिळवुन आरोपीत नामे - १) रमेश ऊर्फ रामकिशन हिरालाल पालिवाल, वय ३० वर्षे, रा. अजमेरनगर, रतन टॉकीज समोर, भिवंडी ता. जि. ठाणे, २) लोकेश हेमराज बोरा, वय ३९ वर्षे, धंदा मजुरी, रा. पटेल कंम्पाऊंड, भैय्यासाहेब आंबेडकर नगर, धामणकर नाका, भिवंडी, ता. जि. ठाणे, ३) दिनेश कुमार रखबचंद जैन वय - ४९ वर्षे, रा. लक्ष्मण बिल्डींग, रुम नंबर ०४, दुसरा माळा, मार्केन्डेय मंदीराच्या मागे, नयी बस्ती, भिवंडी, जि. ठाणे व ४) श्रीनिवास भुमय्या गाजुला वय ४८ वर्षे, रा. अजमेरनगर, रतन टॉकीज समोर, भिवंडी ता. जि. ठाणे अशांना नालासोपारा, भिवंडी व तेलंगणा राज्यातील जि. सिर्सिल्ला अशा विविध ठिकाणांवरुन ताब्यात घेवुन त्यांना सदर गुन्हयात अटक करुन त्यांचे कडे कौशल्यपुर्वक तपास करता अटक आरोपीत यांचे कडुन गुन्हयात वापरण्यात आलेले एक काळया रंगाची युनिकॉर्न मोटर सायकल क्रं. एम.एच. ०४ के. सी. ७४३८ हि हस्तगत करण्यात आली असुन २९८ ग्रॅम वजनाचे सोने असा एकुण १५,२१,७००/- रु किंमतीचा मुद्देमाल आरोपीत यांचे कडुन हस्तगत करण्यात आला असुन खालील १३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | १७२/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,४११,३४ |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २११/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| ३ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | १८९/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| ४ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | १६३/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| ५ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ५२/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २१७/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| ७ | नालासोपारा पोलीस ठाणे | २४९/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| ८ | नालासोपारा पोलीस ठाणे | २४५/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| ९ | नालासोपारा पोलीस ठाणे | ४६/२०२० | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| १० | वसई पोलीस ठाणे | २५७/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| ११ | विरार पोलीस ठाणे | १२६/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| १२ | विरार पोलीस ठाणे | ३०४/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |
| १३ | विरार पोलीस ठाणे | ५२५/२०२१ | भा.द.वी.सं कलम ३९२,३४ |

नमुद अटक आरोपीत यांना मा. प्रथमवर्ग न्यायादंडाधीकारी सो., वसई यांनी दिनांक २९/०७/२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, सपोनि. सुहास कांबळे, पोउपनिरी. शिवाजी खाडे, पोउपनिरी. उमेश भागवत, सफौ. अनिल वेळे, पो.हवा. अशोक पाटील, पो.ना. प्रदीप टक्के, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, पो.शि. अश्विन पाटील सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष-३ यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.



----oooo----